
Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत

# प्रश्न आणि उत्तरे



रविवार शाळा
CBI
चिल्ड्रन्स बायबल इन्व्हेस्टीगेशन मुलांचा

## सीबीआय: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका

प्रगत स्तरावरील विद्यार्थी पुस्तकांसह वापरण्यासाठी

# धडा 1

**1. जर पूढे काय होणार हे तुम्हाला माहीत असले तर तुम्ही जे करता त्यावर त्याचा काय फरक पडेल?**
काही मिनिट हया बद्दल बोला जसे, लॉटरी जिंकण, चांगले कपडे घालण किंवा संकट टालने. मग ही कल्पना सांगा की देव अंदाज लावता येईल अशा रितीने काम करतो आणि तो काय करणार हयाबद्दल आपण त्याने भूतकाळात काय केले हयाच्याकडे पाहून अंदाज लावू शकतो. आपल्या विश्वासाचा एक भाग हा आहे की देव पूढे काय करणार हे जाणणे व त्यात सहभागी होणे. " ज्या परमेश्वराने मला सिंहाच्या व अस्वलाच्या पंजांतून सोडविले तोच मला हया पलिष्टयाच्या हातातून सोडवील. तेव्हा शौल दाविदास म्हणाला, जा, परमेश्वर तुझ्या बरोबर असो." 1 शमुवेल 17:37

**2. दावीदाने गल्याथाला मारण्याआधी त्याची थट्टा केली, असे करणे त्याच्यासाठी योग्य का होते? तुम्ही इतरांची थट्टा करण योग्य होईल का?**
हा थोडा पेचात पाडणारा प्रश्न आहे.दावीदाने गल्याथाची थट्टा करणे हे स्वीकृत नसेल परंतू ते गोष्टीचा भाग आहे. त्यावरून त्याचा विश्वास दिसून येतो.

**3. दावीद त्याच्या भावांची सेवा करीत होता म्हणून त्याला राक्षसासारख्या गल्याथाला मारण्याची संधी प्राप्त झाली. नेतृत्व व सेवा हया दोन गोष्टी एक सारख्या कशा आहेत?**
जरी नेतृत्व व सेवा हे एकमेकांपासून वेगवेगळे आहे, तरी सेवाभावी नेतृत्व ही अशी गोष्ट आहे ज्यामूळे नेतृत्व आणि सेवा एक सारख्या दिसतात.जेव्हा तुम्ही सेवा करता तेव्हा तुम्ही संधी पाहू शकता, जेव्हा तुम्ही त्या संधी पाहता तेव्हा ते नेतृत्वाचे एक स्वरूप असते.

# धडा 2

**1. शिष्य लपले होते कारण त्यांना येशूच्या मरणाचा अर्थ समजला नाही. तुम्हाला काय वाटते की इतर लोक देवाच्या वचनासंबंधी कसा गैरसमज करतात. तुम्ही पवित्र शास्त्र समजता की नाही हे तुम्ही समजू शकता का?**
तुमच्या अधिका-यांना पवित्र शास्त्र समजून घेण्यासाठी मदत मागा. हे पडताळा की पवित्र शास्त्राच्या हया उता-याची माझी समज ही दुस-या उता-याच्या माझ्या समजाशी वाद करत नाही.

**2. शिपायी देवाने जे केले ते इतरांना न सांगण्याच्या दबावाला बळी पडले. इतरांना देवासंबंधी सांगण्याच्या वेळेस तुम्हाला कोणते दबाव वाटतात?**
मुलांना बोलू दया की चांगले असणे किंवा अधिक धार्मिक असणे हया बद्दल मित्र आपल्यावर कसा दबाव टाकतात, हे तो पर्यंत चालू दया जो पर्यंत मुले योग्य चर्चा करतात आणि पुन्हा पुन्हा तेच ते उत्तरे देत नाहीत. आपल्या पूढे येणारे आंतरिक दबाव या बद्दल बोला, जसे स्वार्थीपणा करणे किंवा स्वतःला खूष करणे. निवड करणे सोपे आहे जर चांगल्या आणि आरोग्यदायी गोष्टी योग्य प्रमाणात असतील तर परंतू वाजविपेक्षा ज्यास्त धोक्याचे आहे. कुटुंबाच्या दबावाकडे दुर्लक्ष करू नका. नातेवाइक म्हणतील की तुम्ही येशू बद्दल बोलू नका किंवा दबाव टाकतील की तुम्ही त्यांच्या धार्मीक विधींमध्ये भाग घ्यावा. हया प्रत्येक दबावामध्ये समतोल आहे, लोकांवर प्रिती करणे; हयात दूसरे मत ठेवणे परंतू त्यांचा सन्मान करणे हे असू शकते, परंतू त्याच वेळी देव आपल्याला त्याच्याशी विश्वासू राहण्यास सांगतो.

**3. देवाने स्त्रीयांची निवड केली की त्यांनी त्याच्या शिष्यांना बातमी दयावी. जर शिष्यांनी त्यांचे एकले नसते तर काय झाले असते?** देव आपल्याला इतरांसाठी जो संदेश देतो त्याकडे आपण दुर्लक्ष करणा नाही हयाची खात्री आपण कशी करू शकतो?
विवादास्पद विषयावर बोलण्यासाठी मुलांना मंडळीतील स्त्रीया हया विषयावर बोलण्याची सुरवात करू दया. त्यांना मंडळीतील स्त्रीयांचे स्थान हया विषयावर बोलू दया मग त्यांना इफिस 4 आणि 1 करिंथ 12 कडे निर्देषीत करा जिथे देवाने हे स्पष्ट सांगितले की त्याने वेगवेगळया लोकांना वेगवेगळे दानं दिलेले आहेत आणि जर आपण कोणाचे ऐकत नाही तर त्यांच्या द्वारे देव आपल्याशी जे बोलू इच्छितो ती संधी आपण गमावून बसतो.

## धडा 3

**1. लूक 11:30 आपल्याला येशू व योनाची तुलना करायला सांगत आहे, तुम्हाला येशू व योनाच्या गोष्टी मध्ये किती समानता दिसून येते?**

ही कृती तेव्हा चांगली होते जेव्हा ते स्वतःच्या कल्पना पूढे आणतात. त्यांना योनाचे पुस्तक वाचू दया व थोडाही संबंध असलेले उत्तर स्वीकारा. खालील यादीत काही स्वीकारण्यास योग्य समनता आहेतः

- तीन दिवस कबरेत/माश्यात
- देवाचे वचन सांगणे
- लांबचा प्रवास/चालणे
- वादळाच्या वेळी जहाजाच्या तळाशी शांत झोपणे.
- वादळ शांत करणे
- पाश्चातापासाठी संदेश देणे
- निष्पाप मनुष्याच्या मरणासाठी जे खरे मारेकरी ते त्यापासून स्वतःचे हात धुण्याचा प्रयत्न करतात.
- देवाच्या नजरेतून दूर केले जाणे
- शहराच्या बाहेर वेल/झाड वाळणे

**2. सूचनेकडे दुर्लक्ष करणे किंवा त्या न पाळणे हयातील फरक काय?**

एका दृष्टीने ते एकसारखे आहे कारण त्याचे परिणाम सारखेच आहेत. कोणत्याही प्रकारे, जे करायला सांगितले ते मी केले नाही. परंतू पवित्र शास्त्रातून हे उघड आहे की आपले मन व आपले हेतू हयाची देव पर्वा करतो.परंतू कधी कधी आपण आपल्या वागणूकीसाठी कारणं सांगतो, हे म्हणून की आपल्या कृतीसाठी आपल्याला जवाबदार धरले जावू नये कारण ती कृती करण्याची आपली इच्छा होती. हया विषयाची अधिक चर्चा करण्यासाठी तुमच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करा.

**3. कोणत्या गोष्टी इतक्या वाईट आहेत की त्याची क्षमा होवू नये?**

तुमच्या विद्यार्थ्यांबरोबर वेगवेगळया वाईट गोष्टींची चर्चा करा उदा. अनेक खून करणारा खूनी, दादागिरी करणारे लोक आणि इतर पाप जिथे हे स्पष्ट दिसते की ही कृती करणारा आणखी चांगली वागणूक करू इच्छितच नव्हता. जे लोक लहान मुलांना नशेचे पदार्थ विकतात त्यांच्या बाबतीत काय? (योनाची इच्छा नव्हती की देवाने निनवेच्या लोकांची क्षमा करावी, परंतू देव कृपाळू आहे तो आपणा सर्वांना क्षमा करतो.)

## धडा 4

**1. शाळेतील नवीन विद्यार्थ्यांसाठी तुम्ही शेजारी कसे बनू शकता? भिका-यासाठी? त्रासदायक भाऊ किंवा बहिणी साठी?**

इतरांना मदत करण्याच्या मार्गासंबंधी मुलांना बोलू दया, जरी त्यांची इच्छा नसली तरी किंवा नवीन व्यक्तिला मदत करतांना ते सर्वासमोर दिसून आले तर काय. चर्चा करा की आपल्या लहान बहीण किंवा भावाल मदत करणे किती कठिण आहे.

**2. हया विषयी बोला की कसे एखादया प्रसिध्द व्यक्तिने त्याच्या वागणूकीचे समर्थन केले.जर त्या परिस्थितीत ते देव व शेजारी हयांच्यावर प्रिती करत असते तर ते कसे वागले असते?**

राजकिय नेते, संगीतकार, खेळाडू आणि नट हे वाईट वागणूकीसाठी बरेचदा बातम्यांमध्ये येतात.मुलांच्या ओळखीचा एखादा व्यक्ति निवडा आणि त्यांनी जे केले त्याबद्दल चर्चा करा. जर मुले त्यांत गुंतले तर दोन्ही बाजू बद्दल बोला, मग संभाषण हया गोष्टीकडे वळवा की देवाची प्रिती दाखविण्यासाठी त्यांनी काय करायला पाहीजे होते, परंतू पहिले चांगले उत्तर स्वीकारून थांबू नका, त्यांना गुतवून ठेवा.

**3. एखादया परिस्थिती बद्दल चर्चा करा जिथे कोणी तरी नियम पाळण्याचा प्रयत्न करत होता परंतू तसे करीत असतांना त्यांना अधिक मूलभूत नियम तोडला.**

तुम्ही शाळेतील नियम, पोलिस राबवत असलेले नियम, मंडळीचे नियम किंवा इतर जागा जिथले नियम वाजवि वाटत नाहीत त्या बद्दल बोलू शकता. उदा.शाळेतील मोठया हॉल मध्ये धावण्यासाठी त्रासात सापडणे परंतू तुम्ही तर वर्गाला जायला उशीर होवू नये म्हणून धावत होते.किंवा बोलल्याबद्दल त्रासात सापडणे जेव्हा तुम्ही केवळ खोडरबर घेत होते किंवा वर्गाला उशीर होवू नये म्हणून कुपणावरून उडी मारतांना तुमचे स्वेटर फाटले, परंतू घरी गेल्यावर मात्र स्वेटर मूळे तुम्ही त्रासात पाडला.

# धडा 5

**1. तुम्हाला देवाने दिलेल्या देणग्यासह तुम्ही देवाची सेवा करण्यासाठी काय करू शकता?**

त्यांना बाहेरच्या गोष्टी ज्या ते बदलू इच्छितील त्याबद्दल बोलू दया जसे नाक, हनवटी, डोळे, तोंड इत्यादी. त्यांना इतरांचया शारीरीक गोष्टीबद्दल हसू देवू नका. काही वेळानंतर त्यांची चर्चा काल्पनीकता, हुशारी आणि कुटुंबातील आजार हयाच्या कडे न्या. हया सर्व गोष्टी देवाच्या रचनेचे एकत्रिकरण आहेत. आपल्याला देवाने जे दिले ते आपल्याला आवडले नाही तरी आपण स्वीकारावे.देवाने तुम्हाला तुमचा रंग व कातडी त्याची योजना पूर्ण करण्याच्या हेतूने दिला असेल.

**2. तुम्हाला पाळावे लागले असे सर्वात कठिण आज्ञा कोणती होती?**

प्रत्येकाला त्यांच्या वयैक्तिक यशा बद्दल बोलण्यास प्रेरित करा जेणे करून त्यांना समजेल की प्रत्येक जण एक ना दुस-या प्रकारे आज्ञा पाळत आहेत. फुशारकी मारण्यापासून लोकांना दूर ठेवा. उदा. अंधारात दुकानात जाणे, घाबरविणा-याच्या घराजवळू चालत येणे, किंवा चूकलेला गृहपाठ पुन्हा करणे.

**3. तुमच्या मावशी आणि काका सारख्या कुटुंब सदस्यांनी तुमची काळजी घेण्यासाठी कधी आपुलकी दाखवीली?**

त्यांना आजी आजोबा, मावशी, काका, मामा, चुलते हयांच्या बद्दल बोलू दया. त्यांना कुटुंबातील सदस्यांबद्दल नकारात्मक बोलण्यापासून आवरा. उत्तर वेगवेगळे असतील, परंतू मला नाश्ता देणे किंवा मला ओळखीच्या ठिकाणी काम लावणे असेही उत्तरे स्वीकारा.

# धडा 6

**1. आज आपण आरोग्य प्राप्त होणे हे का पाहू शकत नाही?**

मुलांना आरोग्य मिळणे हया बद्दल बोलू दया, देवाने तुमच्या शहरात किंवा मंडळीत काय केले. कोणता पंथ आरोग्य प्रदान करणे हया वर विश्वास ठेवतो हयाची चर्चा करा. कोणत्या कारणांनी आरोग्य मिळणे कमी झाले आहे त्याबद्दल बोला; कमी विश्वास; आरोग्य देण्याचे दान असलेले कमी शिष्य, तुमच्या क्षेत्रातील विरोध, कमी लोकांची विनंती किंवा संजीवनाचा अभाव.

**2. मी ज्या आरोग्याची वाट पाहत आहे ते न मिळण्याचे कारण काय असावे?**

विश्वासाची कमी, किंवा देवाकडे तुमच्यसाठी वेगळी योजना असणे, तो तुमचे भविष्य पाहू शकतो किंवा तुमचे हेतू चांगले नसणे. कदाचीत असेही असू शकते की तुमचे बरे होणे हे तुमच्यासाठी सर्वोत्तम नसेल किंवा तुमच्या जीवनातील पाप, किंवा हि योग्य वेळ नसेल किंवा तुमच्या आजारात देवाचे गौरव व्हावे.

**3. 10 कुष्ठरोग्यांना बरे होण्याचा अधिकार होता का?**

आज सर्वत्र अधिकार गाजविल्या जात आहे, जिथे सर्वांना वाटते की त्यांना काहीतरी मिळाले पाहीजे आणि म्हणून ते आभारी राहत नाही.आपल्याला काय प्राप्त करण्याचा अधिकार आहे. शिक्षक हया नात्याने तुमचे ध्येय हे आहे की त्यांना सांगणे की काही प्राप्त करणे हा त्यांचा अधिकार नाही. आपण जे आहोत व आपल्याकडे जे आहे त्याबद्दल आपण आभारी असलो पाहीजे कारण त्या गोष्टी देवाने आपल्याला पृथ्वीवर आपले काम करण्याससाठी दिल्या आहेत.

# धडा 7

**1. क्लोनच्या बाबतीत तुम्हाला काय वाटते? आपण विज्ञानाच्या मदतीने मानव तयार करू शकतो का?**
तुमच्या विद्यार्थ्यांना निर्मितीच्या वेळेस देवाचे कार्य हयाबद्दल बोलू दया, की कसे देवाने शून्यातून सर्वकाही निर्माण केले आणि आपल्याला जर काही तयार करायचे असेल तर आपल्याला देवाचे विज्ञानच वापरावे लागतो. एखादयाला सारखा डीएनए वापरून तयार करण्याची नैतीकता व किती देश हयाला परवांगी देतात व किती देत नाहीत हयाबद्दल विचार करा.

**2. जर आपण जुन्या कराराधीन नाही तर मग मला आठवडयातील एक दिवस आराम करण्याची काय गरज आहे?**
हया प्रश्नाचे उत्तर देण्याआधी तुमच्या पाळकाबरोबर चर्चा करा की तुमचा पंथ शाब्बाथ पाळतो का व तो कसा. तुमच्या विद्यार्थ्यांबरोबर बोला की जरी तुमचा पंथ शाब्बाथ पाळत नसेल तरी जर आपल्या शरीराला आवश्यक तो विसावा मिळाला नाही तर आपले शरीर लवकरच थकून जईल. कृपेच्या अधीन सुध्दा आपण दर आठवडी विसावा घेतला पाहीजे. देवाला माहित आहे की आपल्याला त्याची आवश्यकता आहे.

**3. पुर्नवापर, जागतीक तापमानवाढ, प्राण्यांना लूप्त होण्यापासून वाचविणे हया बद्दल काय? ख्रिस्ती लोकांनी त्यात भाग घेतला पाहीजे का?**
वादाची एक बाजू ही आहे की आपल्याला देवाने त्याच्या निर्मीतीवर प्रभूत्व दिले आहे व आपण त्याची काळजी घेतली पाहीजे.व्यवहारीक दृष्टया बोलता, आपण प्रदूषणाबद्दल सतर्क असलो पाहीजे व प्राण्यांची काळजी घेतली पाहीजे. वादाची दुसरी बाजू ही आहे की लोक लढाई, छळ हयात मरत आहेत आणि मनुष्यांविरूध्द बरेच वाईट होत आहे, मग आपण लोकांना सोडवायचे सोडून प्राण्यांना सोडविण्यासाठी साधनं का वापरावे. हया चर्चेचे काहीच उत्तर नाही, म्हणून शिक्षक हया नात्याने तुमच्या विद्यार्थ्यांना स्वतः विचार करण्यास चालना देणे हा तुमचा उद्देश आहे.

# धडा 8

**1. आरोग्य प्राप्त करण्यात विश्वासाची काय भूमिका आहे?**
विश्वास म्हणजे दिसत नसतांना एखादया गोष्टिवर विश्वास ठेवणे. हे उदाहरणं आपल्याला आरोग्य प्राप्त करण्यात विश्वासाची भूमिका दाखवून देतातः एक महिला जीला वाटले की केवळ स्पर्श केल्याने ती बरी होईल. येशूने तिला म्हटले," तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे." मार्क 2 मध्ये एका माणसाच्या मित्रांनी त्याला घराच्या छपरातून खाली सोडले आणि पवित्र शास्त्र सांगते की जेव्हा येशूने त्याच्या मित्रांचा विश्वास पाहीला तेव्हा त्याने त्याला बरे केले. लूक 7 मधील शताधीपतीचा विश्वास संपूर्ण देशात मोठा होता कारण त्याचा विश्वास होता की येशू दुरून सुध्दा आरोग्य देऊ शकतो. मत्तय 15 मध्ये एका महिलेने तीचा विश्वास दाखवून येशूचे मन बदलले आणि तिला हवे असलेले आरोग्य प्राप्त केले. म्हणूनच आरोग्य प्राप्त करण्यासाठी विश्वास अत्यंत महत्वाचा आहे, जर तुम्हाला आरोग्य प्राप्त होत नसेल तर ते विश्वासाच्या कमी मूळे असू शकते. बरेचदा आपल्याला आरोग्य का प्राप्त होत नाही हे स्पष्ट होत नाही परंतू आपण हे समजले पाहीजे कि विश्वास महत्वाचा आहे.

**2. जर तुम्हाला तुमच्या विश्वासासाठी शाळेप्रमाणे गुण मिळाले तर किती मिळतील?**
गुणपत्रक काय आहे हयाची चर्चा करा, उत्तीर्ण होणे व अनुत्तीर्ण होणे. (तुमच्या देशातील गुणाची पद्ध्त वापरा. काहींना 10 गुण असतील किंवा विश्वासासाठी अ मिळेल.) जर तुम्ही विश्वासात जेमतेम पास झाले तर कसे वाटेल आणि जर तुम्हाल 10 पैकी 10 मिळले किंवा अ दर्जा मिळाला तर कसे? उदा. माघार घेणे म्हणजे अनुत्तिर्ण होणे, परंतू टिकून राहणे आणि आज्ञा पाळणे हे उत्तीर्ण होणे आहे. जर तुम्ही आज्ञा पाळता परंतू तुम्ही कूरकूर करता तर ते ब दर्जा किंवा 10 पैकी 8 गुण मिळणे असे होईल.

**3. विधर्मी लोकांचा विश्वास कशा प्रकारचा असतो?**
विश्वास म्हणजे जे तुम्ही पाहू शकत नाही त्यावर विश्वास ठेवणे, आणि म्हणून विधर्मी लोकांकडेही विश्वास आहे. जेव्हा आपण खूर्चीवर बसतो तेव्हा आपला विश्वास असतो कि ती तुटणार नाही. उत्पत्ति वर विश्वास असावा लागतो किंवा एखादा राजकिय नेता निवणूक जिकेल अशी अशा धरण्यासाठीही विश्वास असावा लागतो. लोकांचा ख-या नसलेल्या देवावर विश्वास असतो किंवा कधी कधी त्यांची अपेक्षा भंग करणा-या लोकांवर विश्वास असतो. विश्वास जगात सर्वत्र आहे, आणि प्रत्येकाचा तो कशा न कशात असतो.

## धडा 9

**1. जेव्हा लोक इतरांचा न्याय करतात तेव्हा कसे दृष्य असते?**
कधी कधी न्याय करणे कुजबुजणे, हसणे, कोणातरी कडून दूर जाणे किंवा कोणाशी तरी न बोलणे असे दिसते.शिक्षक हया नात्याने तुमचा उद्देश हा आहे की हया बद्दल बोला की पौल ख्रिस्ती लोकांना मारत होता म्हणून लोकांना त्याचा कसा न्याय करावासा वाटला असेले. आणि आपल्याला वाटत नाही अशा व्यक्तिला त्याच्या कार्यासाठी देव कसा निवडू शकतो.

**2. ख्रिस्ती हया नात्याने आपल्याला शत्रू नसावे, म्हणून माझा कोणता शत्रू आहे ज्याच्यावर मी प्रिती करावी?**
तुमच्या मुलांबरोबर चर्चा करण्याचा प्रयत्न करा की ख्रिस्ती लोक अविश्वासणा-यां सारखेच वाद करतात, कधी कधी त्यांच्या पेक्षा ज्यास्त वाद करतात.स्वतःशी लबाडी करू नका, आपण स्वीकारले पाहीजे की आपल्याला शत्रू आहेत.ज्यांच्याशी आपले पटत नाही, ज्यांनी आपले मन दुखाविले आहे, किंवा आले काहीतरी किंवा कोणी तरी आपल्या पासून हिरावून घेतले असे ते आहे. अशा लोकांना आपण प्रिती दाखविली पाहीजे.

**3. जर देव तुमच्या बरोबर बोलू इच्छित आहे आणि तुम्ही ऐकत नाही तर तुमचे लक्ष वेधण्यासाठी तो काय करेल?**
कधी कधी आपले लक्ष त्याच्या कडे वेधण्यासाठी देव मोठी गोष्ट करतो जसे मित्राला गमाविण, किंवा तुम्हाला दुस-या शहरात किंवा राज्यात नेणे, परिक्षेत वाईट मार्क मिळविणे, मित्राला दुस-या वर्गात टाकणे किंवा कोणालातरी रस्त्यात रडतांना पाहणे. आपले लक्ष वेधण्यासाठी देव काहीही करू शकतो कारण तो आपल्या भौतिक आरोग्या पेक्षा आपल्या आत्मिक आरोग्या संबंधी ज्यास्त चिंता करतो.

## धडा 10

**1. देवा तुमच्या बरोबर बोलत आहे हे तुम्ही कसे सांगू शकता?**
सर्व ख्रिस्ती लोकांनी देवाची वाणी कशी ऐकावी हे शिकले पाहीजे.प्रथम तुम्ही जे ऐकता त्याची पवित्र शास्त्रातून खात्री करा आणि हे निश्चीत करा की देवाने जे केले व म्हटले त्याच्या अनुसार ते आहे की नाही. दुसरी गोष्ट तुम्ही तुमचे अधिकारी, आईवडील, पाळक किंवा शिक्षक हयांच्या कडे जावून ते पक्के करू शकता. तिसरी, तुमच्या स्वतःच्या आत्म्यात निश्चीत करा की ते बरोबर वाटते की नाही.

**2. भूते खरे आहेत का?**
शमूवेलाबरोबर भूत बोलत नव्हते, देव स्वतः त्याच्या बरोबर बोलत होता, परंतू हया गोष्टी मूळे भूताचा विचार येतो. पवित्र शास्त्र स्पष्ट करते की आता हया पृथ्वीवर देवदूत व दुष्टआत्मे आहेत, आत्मीक व्यक्ति जे आपण पाहू शकत नाही. पवित्र शास्त्रात कुठेही सांगितलेले नाही की मेलेले व्यक्ति घराच्या आजूबाजूला भूतासारखे फिरत राहतील. म्हणून जेव्हा लोकांना वाटते की भूत आहे तेव्हा एकतर ती त्यांची कल्पना असते किंवा तो भूत असतो.आपल्याकडे भूतांना धमकाविण्यासाठी देवाकडून अधिकार आहे आणि आपण प्रत्येक भितीदायक विचारावर विजय मिळविला पाहीजे.म्हणून ख्रिस्ती हया नात्याने भूतांना घाबरण्याची गरज नाही. आपण आपल्या मनाला भटकणे थांबवावे असे सांगू शकतो किंवा आपण भूतांना धमकावू शकतो की त्यांनी आपल्या आजूबाजूला येऊ नये.

**3. मी कोणाचे ऐकावे?**
तुम्ही जर कोणा सारखे होवू इच्छित नाही किंवा त्यांनी जे प्राप्त केले ते प्राप्त करू इच्छित नाही तर त्यांचा सल्ला ऐकू नका. तुम्हाला योग्य ते करायचे आहे का? मग कोणाचाही सल्ला घेऊ नका जो पर्यंत तो पवित्र शास्त्र जे सांगते त्याच्याशी जुळत नाही. जे आत्मिक रित्या तुमच्या पूढे गेले आहेत त्यांचे ऐका तुम्ही त्यांच्या सारखे झाले पाहीजे.

# धडा 11

**1. तुमच्या जीवनात अन्याय कसा झाला? तुम्हाला काय वाटते की देव ते कसे बरोबर करील?**
तुमचे विद्यार्थी काय सांगतात ते स्वीकारा. कोणतेही उत्तर चूक नाही.प्रत्येकाकडे अन्यायाच्या गोष्टी असतीलच.तुमच्या विद्यार्थ्यांना दोन्ही बाजूची चर्चा करू दया. मत्तय 19:29 दाखविते की ज्यांनी देवासाठी त्याग केला त्यांची देव परत फेड करील. मत्तय 20 दुसरी बाजू दाखविते की वेगवेगळया तासांच्या कामासाठी कामक-यांना सारखे वेतन मिळते.हया दाखल्यात जीवन न्यायी नाही आणि ते तसेच राहील. मुलांना दोन्ही बाजूबद्दल बोलू दया.

**2. जर मी खूप प्रार्थना केली तर काय होते?**
देव वस्तू बाहेर काढणारी मशीन नाही. कधी कधी तो आपल्याला "नाही" किंवा "आता नाही" असे उत्तर देतो. आपल्यासाठी जे उत्तम ते देण्याची देवाची इच्छा असते, जरी ते आता कठिण वाटत असले तरी. देवाची इच्छा आहे की आपण प्रार्थना करावी आणि कधी कधी तो आपण प्रार्थना केल्यावर त्याचे मन बदलेल. परंतू आपल्याला पाहीजे ते उत्तर नेहमी मिळणार नाही.

**3. येशूकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?**
बरेचदा ख्रिस्ती लोक समस्या नसलेल्या जीवनाची अपेक्षा करतात, की येशू त्यांचे जीवन त्यांच्यासाठी सोपे करील आणि ते नेहमी निरोगी राहतील. क्षमा असावी, तसे नाही, येशूने म्हटले की ख्रिस्ती लोकांचे जीवन अधिक कठिण राहील सोपे नाही. सैतान सध्या मोकळा आहे व आपला नाश करण्याचा प्रयत्न करीत पृथ्वीवर भटकत आहे. आपली अपेक्षा ही असावी की येशू कठिण समयात आपली मदत करेल की आपण योग्य निर्णय घ्यावे. ही नाही की तो आपला कठिण समय दूर करील.

# धडा 12

**1. सर्वजण स्वर्गात का जात नाहीत?**
सर्वांनी पाप केले आहे आणि पवित्र शास्त्र सांगते की त्यांनी नरकात गेले पाहीजे. देवाला रोबोट नकोत आणि त्याने आपल्याला स्वतःची इच्छा शक्ति दिली आहे.देवाची इच्छा आहे की सर्वांचे तारण व्हावे, परंतू काही माणसांनी त्याच्या मार्गाने चालण्याची व येशू किंवा स्वर्ग न निवडयाची निवड केली आहे आहे.

**2. इतरांबरोबर वाटण्यासाठी सर्व काही पूरेसे का नाही?**
पहिले गोष्ट भरपूर असणे अस्थिर ध्येय आहे, आणि दर वर्षी प्रत्येक देशात बदलत असते. दुसरी येशूने म्हटले की आपल्या बरोबर नेहमीच गरजवंत असतील. आणि तिसरी की आपण दयावे हे चांगले आहे.

**3. सफेद लबाडी किंवा लहान पाप म्हणजे काय?**
हेतू महत्वाचे आहेत. तुम्ही कोणाच्या तरी भावना सांभाळण्यासाठी खोटे बोलत आहात की तुम्ही पैसे वाचविण्यासाठी खोटे बोलत आहात? देवाला फसवणूक आवडत नाही. त्यांनी कमी पैसे देऊन खोटे बोलण्यापेक्षा, जमीन विकली नसती तर बरे झाले असते.

# धडा 13

**1. मी इतरांना देवाबद्दल सांगितले पाहीजे का?**


ख्रिस्ती व्यक्तिंनी इतरांना देवाबद्दल सांगण्यासाठी तयार असले पाहीजे. 1 पेत्र 3:15 सांगते की” तुम्हा मध्ये जी आशा आहे तिची विचारपूस करणा-या प्रत्येक इसमाला उत्तर देण्यास नेहमी सिध्द असा; तरी ते सौम्यतेने व भिडेने दया. “ मत्तय 28:19-20 सांगते की आपण सर्व जगात जाऊन सुर्वातेची घोषणा करावी. आपल्याला ते एकटे करावयाचे नाही देव आपल्याला त्याच्यासाठी मदत करेल. प्रेषित 1:8 पवित्र आत्मा आपल्याला साक्ष देण्याचे सामर्थ्य देईल. काही लोक इतरांना सांगतात कारण ते त्याचे विशेष दान किंवा बोलावणे आहे.( इफिस 4:11 दानांची यादी आणि सुर्वातीकाचे बोलावणे) जर मुलांना सुर्वाता सांगण्याचे दान नसेल तर त्यांनी हे मानू नये की त्याच्या शाळेत, शेजारी पाजारी व ज्या कोणाला ते भेटतात त्यांना सुर्वाता सांगण्याची जवाबदारी त्यांची आहे. परंतू आपण देवाबद्दल इतरांना सांगण्याची तयारी दाखवावी.

**2. तुमचे मित्र तुमच्या बरोबर कसे बोलतात? जर देवाकडून ”ट्विट“ आला तर तो कसा असेल?**

आपण फेसबूक, चॅट, ट्विटर, मोबाइल, फेस टू फेस आणि ब-याच प्रकारे मित्रांबरोबर बोलतो. देवाचे तुमच्यासाठीचे संदेश वयैक्तिक आहेत की सार्वजनिक? देव कधी कधी आपल्याला जाण्यासाठी सांगतो आणि कधी कधी थांबून मदत करण्यासाठी. कधी कधी तो आपल्याला एका शब्दात निर्देश देतो. आपल्याला त्याचे पूर्ण ”ट्विट“ समजले नाही तरी आपण त्याची आज्ञा पाळण्याची निवड करू शकतो.

**3. स्वप्न किती विश्वासयोग्य आहेत? लोक भविष्य सांगणा-यांना भविष्यात काय होणार आहे हे सांगण्यासाठी पैसे का देतात?**

मुलं दररोज सकाळी त्यांच्या स्वप्नांबद्दल बोलण्यात आनंद मानतात. त्यांना ते सांगण्यासाठी थोडा वेळ दया, त्यांच्या लक्षात येईल की त्यांच्या स्वप्नांचा काही अर्थ निघत नाही आणि ते सहसा अशक्य असतात आणि ते आधल्या रात्री पाहिलेल्या टीवी मालिका किंवा चित्रपटाशी संबंधीत असतात. जरी देव कधी कधी स्वप्नाचा उपयोग करतो तरी ते फार थोडया वेळेस आहे. कधी कधी देव आपल्याबरोबर स्वप्नात बोलू शकतो पंरतू ते आपली दिशाभूल करू शकतात. आणि भविष्य सांगणा-यावर विश्वास ठेवता येत नाही. अनुवाद 18:10-12 ”जो कोणी असे करितो त्याचा परमेश्वराला वीट आहे....“ देव त्याच्या लोकांना भविष्य सांगणा-याबद्दल चेतावनी देतो कारण त्याला माहीत आहे की त्यांनी त्यांच्या भविष्यासंबंधी देवावर विश्वास ठेवणे अधिक चांगले आहे, परंतू माणसांन भविष्य आधीच जाणून घेण्याची इच्छा असते. देवाची इच्छा आहे की लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा.




**www.childrenareimportant.com**
info@ChildrenAreImportant.com
WhatsApp: +1 (971) 328-2783


Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत